**एम.ए.सी.पी.क्र.१७/२०२२**
CNR - MHST01-001051-2022
(सागर नवनाथ खांडेकर विरुध्द
एच.डी.एफ.सी. जनरल इन्श्युरन्स.)

## निशाणी क्र.२३ खालील आदेशः–

जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस झालेला उशीर माफ होऊन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.२३ वरील अर्ज व अर्जदारातर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) जाबदार क्र.२ यांच्या कथनाप्रमाणे आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही व त्यांनी जाणुनबुजून उशीर केला नाही. जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल असे कथन केले. अर्जदारतर्फे जाणुनबुजून उशीर केल्याची हरकत घेऊन अर्ज नामंजुर करणेची विनंती केली.

४) जाबदार क्र.२ यांनी त्यांना आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नसल्याचे कारण दिले आहे व न्यायाच्या दृष्टीने सदर विलंब माफ होण्याची जाबदार यांनी मागणी केली. अर्जदारातर्फे हरकत घेऊन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. जाबदार क्र.२ तर्फे अर्जात नमुद केलेली कारणे, अर्जदाराचा आक्षेप तसेच प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुत प्रकरणाचा गुणदोषावर निकाल होणेकरीता अर्ज मंजुर करुन जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणे उचीत होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

(१) अर्ज (निशाणी क्र.२३) मंजुर करणेत येतो.
(२) जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करणेस परवानगी देणेत येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2023.06.05 15:56:16 +0530

सातारा. (नि.ह. जाधव)
दिनांक – ०५/०६/२०२३. जिल्हा न्यायाधीश–६ व
सदस्य, मोटार अपघात न्यायाधिकरण, सातारा